भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०८/२०१७

**१) खुन करून ओळख पटु नये या उददेशाने पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक १६/०८/२०१७ चे १७.३० वा. ते दि. १७/०८/२०१७ चे १०.२१ वा.दर.पोलीस स्टेशन तुमसर मर्ग क्र. २३/१७ कलम १७४ जा.फौ. चा दाखल असुन सदर मर्गचा तपास पोउपनी खैरकर पो.स्टे तुमसर यांनी केला आहे. मृतकाचा शवविच्छेदनाचा अग्रीम अहवाल आज दि. १८/०८/२०१७ ला पो.स्टे ला प्राप्त झाला असुन त्यात मृतकचा मृत्यु asphyxia due strangulation where as body is totally burned and burn injuries were post morten burn injuries असे नमुद आहे मृतक विक्की नेविंदराम गोपलानी वय ३० वर्ष रा.गोंदिया हा दि. १६/०८/२०१७ ला सकाळी गोदिंया येथुन भंडारा येथे जातो असे सांगुन निघाला होता त्या दिवशी १६.३० ते १७.०० वा. दर. तो बोरी येथील सुधाकर कांबळे याचे घरी आला होता व १७.३० वा. पावेतो तेथे थांबुन परत जाण्यासाठी निघाला होता त्यानंतर दि. १७/०८/२०१७ रोजी त्याचे प्रेत जळालेल्या अवस्थेत घटनास्थळी आढळुन आले होते आज पावे तो केलेल्या चौकशी व शवविच्छेदन अहवालावरून मृतक यास कोणीतरी अज्ञात आरोपी इसमाने अज्ञात कारनावरून दि. १६/०८/२०१७ चे १०.२१ वा. दरम्यान त्याचा गळा दाबुन खुन करून ओळख पटु नये या उद्देशाने त्यास जाळुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याने मर्गचा तपासचा चौकशी अहवाल व मृतकचे शवविच्छेदन अग्रीम अहवाल पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०२,२०१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन लोखंडी कात्याने हातावर मारुन व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १८/०८/२०१७ चे २०.३० वा. दर यातील फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ असुन ते वेगवेगळे राहतात. फिर्यादी व फिर्यादीची आई श्रीमती– सुनिता हेमराज भोयर वय ४५ वर्ष, हे एकत्र राहतात यातील फिर्यादी हा पानठेला बंद कर्‍यास गेला असता आरोपी आपले आई सोबत बोलत असतांनी आरोपीने फिर्यादीला मोबाईल दे फोन करायचा आहे. तेव्हा फिर्यादीने मोबाईल का दिला नाही म्हणुन आरोपीने भांडण करुन लोखंडी कात्याने फिर्यादीस मारण्यास धावला असता फिर्यादीची आई अडविण्यास गेली असता फिर्यादीचे आईचे उजव्या हाताला कात्याचा मार लागल्याने व काता हिसकावुन कचऱ्यात फेकला आरोपीने काता मागीतला असता काता दिला नाही म्हणुन फिर्यादीचे उजवे हाताचे तळहातावर चावल्याने व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी कमलेश हेमराज भोयर वय २५ वर्ष, रा. वाकेश्वर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,३२५,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :-**

दिनांक १७/०८/२०१७ चे ११.५२ ते २१.०४ वा. दर. यातील पो.स्टे साकोली अप क्र. ०३३५/१७ कलम ३७९ भांदवि गुन्हयात जप्त करण्यात आलेली पॅशन प्रो मोटार सायकल बिना नं. काळया लाल रंगाची चेसीस क्र. बीएएलएएच १० डब्लु सीजीएल ०१४०९, इंजीन नं. एच ए १०, जीएएनसीजीके ३१०४३ किंमती २०,०००/–रु. ची पोस्टेच्या आवारातील अधिकारी कक्षा समोर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने सरतर्फे पोहवा मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०८/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला दि. १८/८/२०१७ चे १२.००वा दरम्यान तिचे राहते घरी कोणी हजर नसतांना तिला एकटी पाहुन कोणीही नसल्याची संधी साधुन तु माझ्यासोबत चाल असे म्हणुन तिला पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १७/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे जवाहरनगर, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, लाखनी, पालांदुर व पवनी येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५० लिटर हातभटटी दारु किंमती १३६००/–रु. ६८ लिटर १३०मिली लिटर १३० मिली लिटर देशी + विदेशी दारु १ स्कुटी किंमती ६०२०७/–रु. तसेच व जुगारातुन किंमती १३३/–रु. असा एकुण किमती ७३,९४०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करिता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.